

शिवपर्व
वर्धापन विशेषांक २०१९
nandednewslive.com
NNL
मराठी बातम्या
नांदेड जिल्ह्यातील पहिली ऑनलाईन वृत्तवाहिनी

# मंदिरांचे नगर - अर्धापूर



नांदेड जिल्ह्यात अर्धापूर हे एक तालुक्याचे ठिकाण असुन या नगरास प्राचीन इतिहास व संस्कृतिचा फार मोठा वारसा लाभालेला आहे. तो आजही आपणास पहावयास मिळतो. या नगरात विविध कालखंडातिल वुसतत्चीश अवशेष मिळतात त्यात मंदिरातील स्तंभ, मुर्तिशिल्प विशेष, नागरीवास्तू मंदिरस्थापत्य इत्यादिंचा समावेश होतो. ही अवशेष तत्कालीन अराध्यापुर च्या कला व वैभावसंपन्नतिची आणि समृध्दतेची साक्ष देत आहेत. अर्धापूर हे ठिकान नांदेडच्या उत्तरेस १८ कि.मी. आंतरावर असुन माहुर-तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गावर आहे. नांदेड जिल्ह्यात विविध नगरात सातवाहन काल खाडातील अवशेष मिळालेली आहेत यावरून ही अनेक नगरे सातवाहन काळात वसलेली आहेत त्या पैकी एक नगर म्हणजे अर्धापूर हे एक होय. इ.स.पूर्व २३० ते इ.स. २३० या कालखंडात दक्षिण भारतात सातवाहण घराण्याचे राज्य होते. त्यानंतर वाकाटक चालुक्य, राष्ट्रकुट, चालुक्य आणि यादव घराणे असा क्रम लागतो. त्यापैकी चालुक्य घराणे, राष्ट्रकुट घराणे आणि यादव राजवटीच्या काळात आराध्यपूर या नगराचा विकास झाला.

देवगीरीच्या यादव राजाचे सामेत युध्दवंशीय बल्लाळांची आराध्यपूर ही राजधानी होती या नगरातील शिलालेखात सांमत बल्लाळांनी येथील विविध देवस्थानांना मंदिराना दान दिल्याचा उल्लेख शिलालेखातुन समजते. येथे मिळालेला ऐतिहासीक पुरावा म्हणजेच शिलालेख देवगिरीच्या यादव घराण्याचा संस्थापक संम्राट भिल्लम पाचवा यांच्या काळात निर्माण केला असल्याचे समजते. याच नगरात यादव कालखंडातील सम्राट सिंघानादेव यांच्या काळातील दुसर एक शिलालेख व मिळालेला आहे. तो शिललेखा इ.स. १२३६ मध्ये कोरलेला असुन या शिलालेखात या नगरातील अनेक मंदिराचा जिर्णोद्धार आणि अनेक मंदिरे यादव सम्राटांनी केल्याचा उल्लेख सापडते. त्यामुळे आराध्यपूर हे मंदिरांचे नगर म्हणून प्रसिध्दीत आले होते. या नगरात अनेक देवीदेवतांची मंदिरे होती. श्री इंद्रेश्वर मंदीर, केदारदेव मंदिर, भिमेश्वरदेव मंदिर, नागेश्वरदेव मंदिर, विश्वेश्वरदेव मंदिर, संकलेश्वर देव मंदिर, सोमदेव मंदिर, राजेश्वर देव मंदिर, नरसिंघदेव मंदिर, शुभनारायण मंदिर, विनायक मंदिर, चंडिका देवी मंदिर, भरतेश्वर मंदिर, कमलेश्वरदेव मंदिर, एयामल सिध्दनाथ देव मंदिर आणि कालिंका देवी मंदिर.

या विविध देवी देवतांच्या मंदिरा वरुन असे समजते की, या परिसरातील लोकांचे आराध्यदैवत या नगरात होती म्हणुनच देवगिरीच्या यादव राजवटीच्या काळात या नगराचे नाव आराध्यपूर असे होते नंतरच्या काळात मुस्लीम राजवटीत आराध्यपूर या नगराचे नामकरण आर्धापूर झाले असावे.

यादव राजवटीच्या काळात या नगरात प्रसिध्द असे देवी देवतांचे सोळा मंदिरे असल्याचा उल्लेखा येथील शिलालेखात सापडतो. परंतु या पैकी एकही मंदिर आज पाहावयास मिळत नाही. परंतु या सोळाही मंदिरांचे स्थापत्य अवशेष या नगरात जागोजागी पाहावयास मिळतात. सद्यास्थितीत येथे एका उंच टेकडीवर केशवराज नावाचे मंदिर पाहावयास मिळते. परंतु यादर कालिन शिलालेखान असलेल्या सोळा मंदिराच्या यादीत केशवराज मंदिराचा उल्लेख सापडत नाही. यावर प्रसिध्द इतिहास संशोधक डॉ. प्रभाकर देव यांनी असे म्हटले की, इ.स. १२३६ च्या यादवीच्या शिलालेखात उल्लेख असलेल्या सोळा मंदिरा पैकी एक शुभनारायण मंदिर म्हणजेच सद्याचे केशवराज मंदिर होय. या आर्धापूर नगर मंदिराचे नगर म्हणुन ओळखले जात असले तरी आज यादव काल खांडातील मंदिरे केवळ अवशेषाच्या रूपाने पाहवयास मिळतात.

संदर्भ सूची :

१) पोहनेकर न.शे. व ठोसर हरिहर (संपा.) रटवंशीय बल्लाळ यांचा अर्धापूर शिलालेख, मुंबई, इतिहास संशोधन मंडळ १९६५ पृ. १६-२६

२) डॉ. कठारे अनिल व डॉ. साखरे विजया मंदिरे आणि मूर्तिशिल्प अल्फा पब्लिकेशन्स, नांदेड डिसेंबर - २००८.

३) डॉ. देव प्रभाकर, स्थापत्य अवशेष, राजन अमिताभ संपादित स्थानिक इतिहास आणि साहित्य - एक शोध, नांदेड १९८६.

**शब्दांकन -प्रा. डॉ. वसंत व्यंकटराव कदम**
इतिहास विभाग प्रमुख
हु.ज.पा.महाविद्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड.